# महिला व बाल कल्याण विभाग
# जिल्हा परिषद रत्नागिरी

महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे मार्फत जिल्हा परिषद महिला सदस्यांचा अभ्यास दौरा केरळ राज्यात आयोजित केलेला आहे. केरळ राज्यातील कोची , मुन्नार , थेकाडी, एल्लपी कोआलम, या ठीकाणी अभ्यास दौरा आयोजित केलेला आहे. तरी नामांकीत व नोंदणीकृत प्रवासी कंपन्याकडून सदर दौरा आयोजित करण्याबाबत निविदा मागविण्यात येत आहेत. प्रवासी कंपन्यानी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून निविदा सादर कराव्यात.

१) प्रवासी कंपनी भारतीय कंपनी कायदा १९५६ खाली नेंदणी झालेली असावी.
२) प्रवासी कंपनीने संपूर्ण प्रवास कालावधीतील प्रती व्यक्ती खर्चाचा दर नमूद करावा. आठ दिवस ( सहा मुक्काम )
३) सदर दर हे रत्नागिरी ते कोची,मुन्नार, थेकाडी, एल्लपी कोआलम परत रत्नागिरी या प्रवास मार्ग व तेथील मुक्काम व चहा , नाश्ता , भोजन यांचे असावेत.
४) प्रवासी कंपनीला दौ-यामध्ये सहभागी सर्व व्यक्तीला दिवसातून नाश्ता - १ वेळा, चहा - ४ वेळा, जेवण - २ वेळा व निवासाची व्यवस्था करावी लागेल.
५) प्रवासी कंपनीला प्रवासाठी वातानुकूलीत , आरामदायी बस / रेल्वे ची सोय करावी लागेल . बस असल्यास बस प्रवासासाठी २ x २ आसनाची असावी .
६) प्रवासी कंपनीला मुक्काच्या ठीकाणी सहभागी व्यक्तीसाठी वातानुकूलीत कक्ष उपलब्ध करुन दयावे लागतील व अशी व्यवस्था असणा-या व इतर सर्व सुविधानी सुसज्ज असणा-या हॉटेलात किंवा लॉजींग बोर्डीगवर मुक्कामाची व्यवस्था करावी लागेल.
७) प्रवासी कंपनीला सर्व सहभागी व्यक्तीच्या साहित्याची चढ उतार करण्यासाठी व प्रवास सुखकारक होण्या करिता पुरेसा सेवक वर्ग पुरवावा लागेल.
८) प्रवासी कंपनीला प्रवास करण-या सर्व सहभागी व्यक्तीचा पुरेसा विमा उतरवावा लागेल.
९) प्रवासी कंपनीला सदर अभ्यास दौ-यामध्ये वरील ठीकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थाना ( जिल्हा पंचायत, तालूका पंचायत व ग्रामपंचायत ) भेट देण्याकरिता प्रवासी कंपनीने त्याठीकाणच्या संस्थाशी संपर्क साधुन भेटीची व्यवस्था करणे अपेक्षीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी